# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.09.2024** **वारःगुरुवार**

---

1. सत्तर वर्षांवरच्या सर्व ज्येष्ठ नागरिकांचा आयुष्मान भारत पीएम जनआरोग्य योजनेत समावेश करायला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी. सहा कोटी ज्येष्ठ नागरिकांना लाभ मिळणार.
2. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत 70 हजार 124 कोटी रुपये खर्चाचे रस्ते बांधण्यासाठी केंद्राची मंजुरी.
3. राष्ट्रपतींच्या हस्ते फ्लोरेन्स नाइटिंगेल राष्ट्रीय पुरस्कार प्रदान, पुरस्कारार्थींमध्ये चंद्रपूरच्या आशा बावणे यांचा समावेश आणि
4. हॉकीमध्ये पुरुषांच्या आशियाई अजिंक्यपद करंडक स्पर्धेत मलेशियाला हरवून भारताचा उपांत्य फेरीत प्रवेश.

**ज्येष्ठ-विमा**

केंद्रीय मंत्रिमंडळानं सत्तर वर्षांवरच्या सर्व ज्येष्ठ नागरिकांचा आयुष्मान भारत पीएम जनआरोग्य योजनेत समावेश करायला मंजुरी दिली आहे. या ज्येष्ठ नागरिकांचं कोणतंही उत्पन्न असलं, तरी त्यांना योजनेअंतर्गत उपचार मिळणार आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर नवी दिल्लीत माध्यमांशी बोलताना केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री आश्विनी वैष्णव यांनी, हा महत्त्वाचा निर्णय असल्याचं नमूद केलं. या योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना पाच लाख रुपयांपर्यंतच्या खर्चाचे उपचार मोफत मिळणार आहेत. त्यामुळे देशातल्या साडेचार कोटी कुटुंबांना उपचारांच्या सुविधा मिळणार आहेत आणि सहा कोटींहून अधिक ज्येष्ठ नागरिकांना लाभ मिळणार आहे, असंही ते म्हणाले.

आयुष्मान भारत जन आरोग्य योजनेअंतर्गत पात्र असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना विशेष कार्ड दिलं जाणार आहे. या योजनेत आधीपासून समाविष्ट असलेल्या कुटुंबांमधल्या सत्तर वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना दर वर्षी पाच लाख रुपयांपर्यंत खर्चाचे अतिरिक्त आरोग्य उपचार मिळणार आहेत. सत्तर वर्षांपुढच्या इतर सर्व ज्येष्ठ नागरिकांना प्रति कुटुंब पाच लाख रुपयांपर्यंतच्या खर्चाचे उपचार अतिरिक्त मिळणार आहेत. सत्तर वर्षांपुढचे जे नागरिक केंद्र सरकारची आरोग्य योजना, माजी लष्करी अधिकाऱ्यांसाठीची आरोग्य योजना किंवा इतर कोणत्या सरकारी योजनांचा आधीपासूनच लाभ घेत असतील, ते त्या योजनांचा लाभ सुरू ठेवू शकतात किंवा आयुष्मान भारतचा पर्याय निवडू शकतात. या वयोगटातले जे नागरिक खासगी विमा योजनांचा किंवा कर्मचारी राज्य विमा योजनेचा लाभ घेत आहेत, तेही आयुष्मान भारतसाठी लाभ घेण्यासाठी पात्र असणार आहेत.

**ग्रामसडक योजना**

केंद्रीय मंत्रिमंडळानं 2024-25 ते 2028-29 या आर्थिक वर्षासाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या अंमलबजावणीच्या ग्रामविकास खात्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. या योजनेचा एकंदर खर्च 70 हजार 124 कोटी रुपये इतका असणार आहे. केंद्रीय मंत्री आश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत माध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. दळणवळणाच्या कक्षेत नसलेल्या सुमारे 25 हजार पात्र गावांना जोडण्यासाठी 62 हजार 500 किलोमीटरचे रस्ते बांधण्यासाठी आर्थिक साह्य दिलं जाणार आहे. या योजनेमुळे चाळीस हजार मानवी दिवस इतक्या रोजगाराची निर्मिती होईल, असं वैष्णव यांनी सांगितलं.

**मिशन-मौसम**

केंद्रीय मंत्रिमंडळानं मिशन मौसमलाही मंजुरी दिली आहे. या अंतर्गत हवामान बदलांना अनुकूल भारत बनवण्यासाठी दोन वर्षांमध्ये दोन हजार कोटी रुपयांच्या खर्चाला मान्यता देण्यात आली आहे. केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयातर्फे राबवल्या जाणाऱ्या या मिशन मौसममध्ये हवामान आणि वातावरणविषयक संशोधन आणि सेवांना बळ दिलं जाणार आहे. त्यामुळे हवामान आणि वातावरणविषयक माहिती अधिक अचूकपणे मिळण्यासाठी मदत होणार आहे.

**बसखरेदी मंजुरी**

केंद्रीय मंत्रिमंडळानं काल तीन हजार 435 कोटी रुपये खर्चाच्या पीएम-ई-सेवा- पेमेंट सुरक्षा यंत्रणा म्हणजे पीएसएम योजनेलाही मंजुरी दिली. या अंतर्गत सार्वजनिक वाहतूक प्राधिकरणांकडून ई-बस खरेदी केल्या जाणार आहेत आणि वापर केला जाणार आहे. या योजनेअंतर्गत 2024-25 ते 2028-29 या आर्थिक वर्षांमध्ये 38 हजारपेक्षा जास्त ई-बसच्या खरेदीसाठी आर्थिक निधी दिला जाणार आहे, असं केंद्रीय मंत्री आश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. या निधीमुळे बसउत्पादकांना वेळेवर पैसे मिळणार आहेत, तसंच बसच्या खरेदीनंतर त्यांच्या बारा वर्षांपर्यंत देखभालीसाठीही व्यवस्था करण्यात येणार आहे.

**नाईटिंगेल**

2024 या वर्षासाठीचे फ्लोरेन्स नाइटिंगेल राष्ट्रीय पुरस्कार काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशभरातल्या परिचारिकांना प्रदान करण्यात आले. महाराष्ट्रातील आशा वामनराव बावणे यांना हा पुरस्कार मिळाला असून गेली 28 वर्ष त्या चंद्रपूरच्या सरकारी इस्पितळात वैद्यकीय सेवा देत आहेत. बावणे यांनी 20 वर्षे आदिवासी क्षेत्रात सेवा प्रदान केली असून डायरियाचा प्रकोप, हज यात्रा लसीकरण तसंच कोविड काळात दिलेल्या विशेष सेवेचा गौरव म्हणून हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे उत्कृष्ट परिचारिकांना फ्लोरेन्स नाइटिंगेल राष्ट्रीय पुरस्कार दिले जातात. परिचारिकांनी केलेल्या गुणवत्तापूर्ण सेवेला मान्यता देत सन्मानित करण्यासाठी दरवर्षी हे पुरस्कार देण्यात येतात.

**तरंग शक्ती**

भारतीय हवाई दलामार्फत जोधपूरमध्ये तरंग शक्ती हा अनेक देशांचा समावेश असलेला आणि सर्वांत मोठा विमान सराव सुरू आहे. या सरावाच्या निमित्तानं हवाई दलानं भारतीय संरक्षण हवाई प्रदर्शन म्हणजे आयडॅक्स-24 ही आयोजित केलं आहे. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या हस्ते आज त्याचं उद्घाटन होणार आहे. आजपासून चौदा तारखेपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनात विमानविषयक क्षेत्रातील कंपन्यांचा मोठा सहभाग आहे. अनेक उत्पादनं आणि तंत्रज्ञानांची चुणूक त्यात बघायला मिळणार आहे. तरंगशक्तीमध्ये भारत आणि मित्र देशांच्या हवाई सामर्थ्याची आणि नवनवीन आविष्कारांची चुणूक नागरिकांना बघायला मिळणार आहे.

**ई-मंच**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी काल नवी दिल्लीत ट्रेड कनेक्ट ई-प्लॅटफॉर्म या मंचाचं उद्घाटन केलं. देशातल्या उद्योजकांना आंतरराष्ट्रीय व्यवसाय सहजपणे करता यावं या उद्देशानं हा ऑनलाइन मंच तयार करण्यात आला आहे. या ई-कनेक्ट प्लॅटफॉर्मवर सर्व प्रकारच्या नियमावली, मुक्त व्यापार करार, भागिदारी, शुल्क, दर, सवलती तसंच परदेशातल्या संभाव्य खरेदीदारांची माहिती एकाच ठिकाणी मिळणार आहे. हा मंच म्हणजे विविध मंत्रालयं, संस्था आणि संघटना यांनी एकत्र येऊन केलेली मोठी सुविधा असल्याचं गोयल यांनी नमूद केलं आणि त्यामुळे भारताचा जागतिक व्यापारात हिस्सा वाढेल, अशी आशाही व्यक्त केली.

**नागालँड-आयएलपी**

नागालँडमध्ये तीन जिल्ह्यांमध्ये अंतर्गत निवास परवाना म्हणजे आयएलपी लागू करायला राज्य सरकारनं मंजुरी दिली आहे. चुमोकेडिमा, निउलँड आणि दिमापूर या जिल्ह्यांमध्ये आयएलपी लागू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री नेफिऊ रिओ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे नागालँडचे रहिवासी नसलेल्या नागरिकांना या जिल्ह्यांमध्ये प्रवेशासाठी आयएलपी लागणार आहे. हा परवाना लागणाऱ्या नागरिकांची विभागवारी करण्यात आली आहे.

**विएतनाम-यागी**

व्हिएतनाममध्ये यागी चक्रीवादळामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या 170 वर गेली आहे. हनोईमधून काल हजारो नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आलं. यागी हे आशियातलं या वर्षीचं सर्वातं शक्तिशाली चक्रीवादळ असून, त्यामुळे व्हिएतनाममध्ये प्रचंड पाऊस सुरू आहे. हनोईतली लाल नदी वीस वर्षांमधल्या उच्चांकी पातळीवर पोचली आहे, त्यामुळे तिच्या काठांवर्चया नागरिकांनं जनजीवन विस्कळित झालं आहे.

**बुद्धिबळ ऑलिंपियाड**

हंगेरीमधल्या बुडापेस्ट इथं कालपासून पंचेचाळीसावी फिडे बुद्धिबळ ऑलिंपियाड सुरू झाली. पहिल्या दिवशीच्या सत्रात खुल्या विभागात भारतानं मोरोक्कोवर मात केली. तर महिलांच्या विभागातही भारतानं जमैकावर विजय मिळवला. बारा दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत खुल्या विभागात 193 संघ तर महिलांच्या विभागात 181 संघ सहभागी झाले आहेत. एकंदर अठराशे खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. भारतानं गेल्या वर्षी या स्पर्धेचं यजमानपद भूषवलं होतं आणि दोन्ही विभागांमध्ये कास्यपदक मिळवलं होतं.

**हॉकी**

हॉकीमध्ये पुरुषांच्या आशियाई अजिंक्यपद करंडक स्पर्धेत भारतानं उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला आहे. चीनमध्ये हुलूनबुईर इथं सुरू असलेल्या या स्पर्धेत मलेशियाचा 8-1 असा पराभव करून भारतानं उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला. भारत या स्पर्धेत तीन विजयांमुळे नऊ गुण मिळवून गुणतालिकेत प्रथम क्रमांकावर आहे. ही स्पर्धा राऊंड-रॉबिन या पद्धतीनं खेळली जात आहे. सोळा सप्टेंबरला उपांत्य फेरी होणार आहे, तर अंतिम फेरी सतरा सप्टेंबरला होणार आहे.

**पूर-भंडारा**

महाराष्ट्राच्या, भंडारा गोंदिया जिल्ह्यात काल ढग फुटी सदृश्य पाऊस झाल्यामुळे नदी, नाले ओसंडून वाहू लागले आणि अनेक गावांचा संपर्क तुटला. वैनगंगा नदीने धोका पातळी ओलांडली आहे. त्यामुळे गोसीखुर्द धरणाचे 27 दरवाजे दीड मीटरने तर 6 दरवाजे एक मीटरने उघडण्यात आली आहेत. दरम्यान वैनगंगा नदीवर पुलाच्या बांधकामात वापरण्यात येणारी क्रेन पुराच्या प्रवाहात वाहून गेली असून या क्रेनला आठ किलोमिटर अंतरावर पाण्याबाहेर काढण्यात यश आलं आहे.

**हवामान**

विदर्भात तुरळक ठिकाणी वीजांसह तसंच मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. अन्यत्र हलका ते मध्यम पाऊस पडेल.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.